**प्रकल्प प्रवर्तक मे. ठाणे महानगरपालिका, ठाणे, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य यांच्या सर्व्हे नं. ४,५,१३,१४, मौजे अटकोली , तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथील समन्वित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. ठाणे महानगरपालिका, ठाणे, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य यांच्या सर्व्हे नं. ४,५,१३,१४, मौजे अटकोली , तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथील समन्वित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता केयुडी बिझनेस क्लस्टर, शेड नं. डी-१०, सावद गाव, बापगाव रोड, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे आयोजित करण्यात आलेली होती.

सौ. सौजन्या पाटील, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी तथा आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. हरिश्चंद्र बा. पाटील, अपर जिल्हाधिकारी व अपर जिल्हादंडाधिकारी, ठाणे, जिल्हा-ठाणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. किरण हसबनीस, प्रादेशिक अधिकारी, कल्याण (अतिरिक्त कार्यभाग), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण, जिल्हा-ठाणे तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजिका यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प प्रभाव परिसरातील जनतेस प्रस्तावित प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम/प्रभाव व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ठाणे हे मुंबई लगतचे महत्वाचे शहर असून संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्राला सेवा पुरविणारे रहिवाशी शहर आहे. ठाणे शहराला लाभलेल्या निसर्ग सौंदर्यामुळे, दळणवळणाच्या उपलब्ध सोयी, नामवंत आय.टी. पार्क तयार झाल्याने ठाणे शहराची लोकसंख्या रहिवासी क्षेत्र व उद्योग व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ, झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे दैनंदिन कचरा निर्मितीमध्ये देखील वाढ झालेली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये २०२५ साली दैनंदिन १,३००.० मे.टन घनकचऱ्याची निर्मिती होत होती. सदर घनकचऱ्याची नियोजनबध्द विल्हेवाट लावणे अत्यावश्यक आहे.

ठाणे शहरातील दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेकरिता जागेची निकड विचारात घेता ठाणे महानगरपालिकेने शासनाकडे जागेची मागणी केली असता शासनाच्या मंजुरीने तालुका-भिवंडी, मौजे अटकोली, स.नं.४,५,१३,१४ ही जागा मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश दिनांक २२ एप्रिल २०२४ नुसार ठाणे शहरातील घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पध्दतीने व्यवस्थापन करणेकामी ठाणे महानगरपालिकेस प्रदान केलेली आहे.

प्रकल्प प्रवर्तक मे. ठाणे महानगरपालिका, ठाणे, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य यांचा सर्व्हे नं. ४,५,१३,१४, गाव-अटकोली , तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे समन्वित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक १५/०४/२०२६ रोजीचा अर्ज प्रादेशिक कार्यालय, कल्याण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक २३/०४/२०२६ रोजी प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार संवर्ग ब - १ अनुसुची ७ (१) अंर्तगत मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण (एसईआयएए), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (Terms of Reference - ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २३/०९/२०२४ रोजी सादर केला व त्या अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २०/१२/२०२४ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये

तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण १ फेब्रुवारी, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणाऱ्या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक MPCB/४४२/२०२६-००२/ I/२२५९५५३/२०२६ दिनांक ०७/०५/२०२६ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी, जिल्हा-ठाणे यांनी पत्र दिनांक ०८/०५/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हा यांनी त्यांच्या पत्र दिनांक १३/०५/२०२६ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता केयुडी बिझनेस क्लस्टर, शेड नं. डी-१०, सावद गाव, बापगाव रोड, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यास मान्यता दिली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश दिनांक २६/०५/२०२६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी,ठाणे,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(उप विभागीय दंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| **२)** | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>यांचे प्रतिनिधी —<br>प्रादेशिक अधिकारी - कल्याण,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण | - **सदस्य** |
| ३) | उप प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी | - **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ, मुंबई एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस, मुंबई एडिशन यात इंग्रजीत दिनांक १७ मे, २०२६ रोजी प्रस्तावित प्रकल्पाबाबत जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती.

तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, ठाणे,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे,

५) उप विभागीय अधिकारी, भिवंडी, तालुका-भिवंडी, जिल्हा - ठाणे,

६) तहसीलदार, तहसील कार्यालय, भिवंडी, तालुका-भिवंडी, जिल्हा- ठाणे,

७) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भिवंडी, तालुका-भिवंडी.
जिल्हा-ठाणे,

८) ग्रामसेवक (ग्रामपंचायत/ग्रुप ग्रामपंचायत)-अटकोली , आमणे, सापे, कुकसे,चिराडपाडा, पिसे, बापगाव, सावद गाव, चिंबीपाडा व इतर

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

१०) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

११) प्रादेशिक अधिकारी-कल्याण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सिध्दीविनायक संकूल, तिसरा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम)- ४२१ ३०१, जिल्हा-ठाणे

१२) उप प्रादेशिक अधिकारी-भिवंडी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सिध्दीविनायक संकूल, चौथा मजला, ओक बागेजवळ, स्टेशन रोड, कल्याण (पश्चिम)-४२१ ३०१, जिल्हा-ठाणे

१३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक,पडघा पोलिस ठाणे,तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे,

१४) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी यांना ईमेलव्दारे एकूण ०३ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत. तसेच जन सुनावणी दरम्यान व जन सुनावणी नंतर एकूण १२९ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत. प्रत सोबत जोडल्या आहेत.

आयोजिका यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजिका यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या जन सुनावणी समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृत्तात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेतील. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ठाणे शहर व परिसर येथे वेगाने शहरीकरण व लोकसंख्येतील सातत्यपूर्ण वाढ यामुळे शहरातील विद्यमान घनकचरा व्यवस्थापन यंत्रणेवर प्रचंड ताण वाढत आहे. ठाणे शहरातील महानगरपालिका घनकचरा (MSW) निर्मीतीचे प्रमाण सन २०४२ पर्यंत १,२९८.० टन प्रतिदिन (TPD) वरुन २,३१९.० टन प्रतिदिन (TPD) इतके वाढण्याचा अंदाज आहे. त्यासाठी प्रकल्प प्रवर्तक ठाणे महानगरपालिका यांनी अटकोली गावात प्रस्तावित एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन (ISWM) योजना कार्यान्वित करण्याचे नियोजित केलेले असून तेथे वैज्ञानिक, कार्यक्षम व शाश्वत उपाययोजना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. प्रस्तावित प्रकल्पाचे क्षेत्रफळ ३५ हेक्टर (३,५०,००० चौरस मीटर) असून त्यास भांडवली खर्च ₹ २००/- कोटी असुन प्रकल्पास ५०.० केएलडी पाण्याची आवश्यकता आहे. एकूण २,३१९.० टन प्रतिदिन घनकचरा निर्मिती होणार आहे.

प्रस्तावित प्रकल्प सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण, पर्यावरणाच्या गुणवत्तेत सुधारणा आणि भविष्यातील कचरा व्यवस्थापनाच्या वाढत्या गरजा सक्षमपणे हाताळण्यास सक्षम असेल.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पातील प्रक्रियेबाबत, प्रस्तावित प्रकल्पातील लँडफील देखरेखेबाबत तसेच प्रकल्प कार्यान्वित असताना प्रकल्पाती धूळ नियंत्रण, दुर्गंधी नियंत्रण व ध्वनि नियंत्रणाबाबत संपूर्ण माहिती दिली. तसेच प्रकल्पात काम करणाऱ्या कामगारांबाबत आरोग्य व सुरक्षिततेबाबत सविस्तर स्पष्टीकरण दिले.

प्रस्तावित प्रकल्पाचे सामाजिक व आर्थिक फायदे विशद करताना पर्यावरण सल्लागार यांनी समाजाचे जीवनमान सुधारेल व स्वच्छ (Hygienic) परिसर होईल असे सांगितले. तसेच प्रस्तावित प्रकल्पात सीईआर उपक्रम राबविण्यासाठी भांडवली खर्च ३०० लाख राखीव ठेवण्यात येणार असुन आवर्ती खर्च प्रति वर्ष ३० लाख खर्च करण्यात येईल असे सांगितले.

प्रस्तावित प्रकल्पामुळे योग्य घनकचरा व्यवस्थापनामुळे देशाच्या आरोग्य स्थिती सुधारण्यात महत्वपुर्ण भूमिका बजावली जाईल.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण पुर्ण झालेले असून सर्वांनी ते ग्रहण केलेले असेल. पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अधिसूचना, २००६ नुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीच्या तीस दिवस अगोदर एक स्थानिक वृत्तपत्रात मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीत प्रस्तावित प्रकल्पाविषयी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. सर्व जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी त्यांच्या पर्यावरणीय सूचना, विचार किंवा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.

त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी कार्यालयास डॉ. प्रमोद भोईर, भूमीपुत्र संघर्ष समिती यांच्याकडून ईमेल व्दारे सूचना/मत प्राप्त झालेले आहे. आयोजिका यांनी प्राप्त झालेल्या सूचना बैठकीत वाचून दाखविली. डॉ. प्रमोद भोईर यांनी मत मांडले की –

कारणे तक्रार करतो की आमच्या भिवंडी ग्रामीणमधील मौजे अटकोली गाव हद्दीत सुरु असलेल्या डपिंग ग्राऊंडमुळे आमच्या परिसरातील शेती, पाणी, हवा दुषित होऊन भविष्यात जीवन-मरणाचा मोठा प्रश्न उपस्थित होणार आहे. आणि मुळात कल्याण, ठाणे, मुंबई या शहरातील प्रशासनाने त्यांचा कचरा आमच्या दारात का टाकावा? त्यांनी त्यांच्या कचऱ्याची विल्हेवाट का लावू नये हा खरा प्रश्न आहे. म्हणून सदर डपिंग ग्राऊंड कायमचे बंद करुन आम्हांला न्याय द्यावा, अन्यथा करो की मरो असे भूमीपुत्रांचे आंदोलन उभे राहिल. त्याला सर्वस्वी सरकार जबाबदार राहिल. कळावे – अशाप्रकारे उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी कार्यालयात ईमेलव्दारे मत प्राप्त झालेले आहे.

तरी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती करण्यात येते की याबाबत त्यांनी योग्य, अचूक उत्तर बैठकीत जनतेस देण्यात यावे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की डॉ. प्रमोद भोईर यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांनुसार हा प्रकल्प डपिंग ग्राऊंड नसून येथे जो तात्पुरता कचरा टाकण्यात (temporary waste dump) आलेला आहे, त्यासाठी Solid Waste Management Rule, 2016 व Solid Waste Management Rule, 2026 च्या निर्देशांचे पालन करण्यासाठी, सदरहू कचऱ्यावर शास्त्रीयदृष्ट्या प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्यासाठीच प्रस्तावित प्रकल्पाची उभारणी करण्यास येत आहे. म्हणूनच सदरहू प्रस्तावित प्रकल्पास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने Consent to Establish पारित केलेला आहे.

जो तात्पुरता कचरा टाकण्यात (temporary waste dump) आलेला आहे, तो पूर्णपणे काढण्यासाठीच ही sanitary land facility आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे तात्पुरता टाकण्यात आलेला कचरा (temporary waste dump) सुध्दा तेथून नाहीसा होणार आहे. प्रस्तावित प्रकल्प (Facility) सुरु झाला की येणारा कचऱ्याचे लगेचच segregation करण्यात येईल. तेथे खत निर्माण होईल. तेथे Waste to Energy प्रकल्पामुळे तेथे उर्जा निर्माण होणार आहे. एक Sanitary Land Fill site, मटेरिअल Recovery Facility म्हणूच यास एकात्मिक/समन्वित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प असे म्हटलेले आहे. येथे एकाच जागेवर हे विविध विभाग कार्यान्वित होणार आहेत. सर्व कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येईल. जसा प्रकल्प सुरु होईल, त्यानुसार संपूर्ण टाकलेला कचरा पूर्णपणे नाहीसा होईल.

प्रकल्प प्रवर्तक पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अधिसूचना, २००६ नुसार ईआयए अहवाल तयार करण्यासाठी व पर्यावरणाची सद्यस्थिती अभ्यासण्यासाठी प्रस्तावित प्रकल्प परिघाच्या १० कि.मी. सर्वेक्षण केले.

भातसा व काळू नदीत या प्रकल्पाच्या अगोदर पासून असलेले प्रदूषण जाणवलेले आहे. मात्र या डपिंगमुळे इतर प्रदूषण जाणवलेले नाही.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी, पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपली भूमिका मांडताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे. आपले विचार, सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी नोंदविताना जर तो मुद्दा उपस्थितांना अगोदर उपस्थित केलेला असेल, तर तो मांडण्याची आवश्यकता नाही, जेणेकरुन अधिक उपस्थितांना संधी देता येतील.

अध्यक्ष यांनी उपस्थितांना सांगितले की आपण उपस्थित करण्यात येणाऱ्या मुद्यांचे व्हिडिओ रेकॉर्डींग करण्यात येणार आहे, तसेच सदरहू जनसुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येणार आहे. तरी ज्यांना सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आहे, त्यांनी हात वर करा, जेणेकरुन प्रत्येकाला माईकसमोर येऊन संधी देण्यात येईल.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) ॲड. संदीप मंगल जाधव, राहणार-आमणे गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे:-**

विनंती आहे की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी जी माहिती सादरीकरणाव्दारे सांगितली, ती येथील बऱ्याच लोकांना समजलेली आहे. प्रस्तावित प्रकल्पाविषयी लोकांच्या ज्या काही सूचना, हरकती किंवा आक्षेप आहेत, ते ईमेलव्दारे किंवा पोस्टाने आपल्या कार्यालयात प्राप्त झालेल्या आहेत. येथे उपस्थितांनी सूचना, तक्रार/आक्षेप उपस्थित केल्यानंतर त्यास उत्तर ज्यांनी ईआयए अहवाल तयार केला, त्यांनी देऊ नये. तरी सर्व स्थानिकांना त्यांच्या व्यथा मांडू द्याव्यात. आम्ही येथे राहतो, आम्ही माश्यांचा वास घेत असतो. येथे आम्ही आमच्या अडचणी सांगण्यासाठी आलेलो आहोत. तरी लोकांना त्यांच्या हरकती सांगण्याची संधी देण्यात यावी. येथे पिसे गावातून डॉ. घनश्याम पाटील आलेले आहेत. त्यांनी त्यांची तक्रार ईमेलव्दारे सुध्दा तक्रार नोंदविलेली आहे. ते प्रस्तावित प्रकल्पाविषयी त्यांच्या हरकती सांगतील. येथे बरेच उपस्थित लोक आपल्या सूचना किंवा हरकती मांडतील.

**२) डॉ. घनश्याम पाटील, मुक्काम-पिसे डॅम, पोस्ट-आमणे, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे:-**

अटकोली येथे जे डपिंग ग्राऊंड आहे, त्याबाबत आक्षेप, हरकतीचे मुद्दे व त्याचे निराकरण कसे होणार याबाबत आपण प्रश्न उपस्थित करण्यास जमलेलो आहोत.

ठाणे महानगरपालिकेस पाणी कोठुन येते? पिसे धरणातूनच पाणी ठाणे शहरासाठी ठाणे महानगरपालिका घेते. तेही मुंबई महानगरपालिकेने अधिग्रहित केलेल्या भूखंडातून. तसेच मी स्वतः आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना काही दिवसांपूर्वी ईमेलव्दारे येथील गंभीर प्रश्नांची माहिती दिलेली आहे. त्यांनी त्यांच्या संबंधित कार्यालयांना सूचना केलेल्या आहेत किंवा त्यांनी त्यांचे मत तयार केलेले असेल.

म्हणजे ठाणे महानगरपालिकेच्या पाण्याच्या पाईपलाईन पिसे गावात, तुमचे पिण्याच्या पाण्याचे धरण येथे – पिसे गावात आहे. पाणी येथून घेऊन जाता, आणि तुमच्या क्षेत्रातील कचरा/घाण येथे परत आणून

टाकणार का?  आपणास कोणी पाणी प्यायला दिले, तर आपण त्यास विसरत नाही. पण ठाणे महानगरपालिका प्रशासनाने आमचे पाणी घेतले, मात्र त्यांची घाण येथे आणून टाकत आहेत.

जागतिक आरोग्य संघटनेचा (WHO) अहवाल आहे की ज्या ज्या भागात कचरा डंपिंग आहे, त्या त्या भागात आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आहेत.  कल्याण येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कार्यालय आहे. तेथे आधारवाडी डंपिंग ग्राऊंड आहे.  त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने काय कारवाई केली?  तेथे लोकांना राहणे मुश्किल झालेले आहे, तेथील लोकांना श्वसनाचे आजार झालेले आहेत.  तेथे कायम आग लागत असते.  तसेच त्या आगीतून  तेथे कॅन्सरसारखे दुर्धर आजार वाढलेले आहेत. तसेच त्यामुळे तेथे वाढलेले मच्छर, माश्या यामुळे तेथील पाणी प्रदूषित होत आहे. जर ठाण्याला आम्ही पाणी देतो, तर तुमच्या घाणीच्या समस्यांना आम्ही तोंड द्यायचे काय?

पुढील आक्षेप - या परिसरात ठाणे महानगरपालिकेने ५-६ वेळा भूसंपादन केलेले आहे.  मुंबई महानगरपालिकेचे पिसे धरण - १९८९,  ठाणे महानगरपालिका - २०१०,  मुंबई समृध्दी मार्ग - २०१८, टाटा पॉवर लाईन - १९७०, त्यानंतर शासकीय खाणी आणि आता डंपिंग. आमच्या जमिनी घेऊन त्याचा अजूनही मोबदला देण्यात आलेला नाही, मात्र डपिंग आमच्या माथी मारण्यात येत आहे. पिसे गावातील जमिनी ज्या मुंबई महानगरपालिकेने घेतल्या, त्यांचा अजूनही मोबदला मिळालेला नाही.

ठाणे महानगरपालिका आमच्या पिसे गावातून फुकट पाणी घेऊन जातात, त्याबद्दल आमच्या गावाला काय सुविधा, सामाजिक योजना दिलेली आहे?  साधा रस्तासुध्दा दिलेला नाही, तर पिण्याचे पाणी देणे हे खूपच लांब.  जर प्रकल्प पुर्ण नाही, तर तेथे कमीतकमी रोज १०० गाड्या कसा कचरा घेऊन येतात?  आता तेथे किती प्रमाणात धूर निघतो. ज्या जागा आम्ही आमच्या गावातील सुविधांसाठी, गुरुचरण जागा, त्यावर आपला डोळा कशाला हवा?

ठाणे महानगरपालिका आमचे पाणी घेते. तर ठाणे महानगरपालिकेने त्यांच्या कचऱ्याची व्यवस्था ही ठाणे महानगरक्षेत्रातच करावयाची आहे. जर आपण शास्त्रीय पध्दतीने करणार आहात, तर ती तुमच्याच क्षेत्रातच करा. जर कचऱ्याचा वासच येणार नाही असा दावा करता, तर ठाणे महानगरपालिका क्षेत्रात/हद्दीत कचऱ्याची व्यवस्था करण्यात यावी. आजूबाजूच्या परिसरात जागा विकत घ्या, भाड्याने घ्या, तेथे कचरा डंपिंग करण्यात यावे.

प्रकल्प स्थानापासून १/२ कि.मी. अंतराच्या आतच नदी आहे. मात्र पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात (ईआयए) नमुद केलेले आहे की प्रकल्प परिघाच्या १० कि.मी. अंतरात कुठलाही पाण्याचा साठा

नाही. तसेच ईआयए अहवालात नदीचे नाव उल्हास नदी असे चुकीचे लिहिलेले आहे. म्हणजे हा अहवाल चुकीचा असून स्थानावर न जाता अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

भातसा नदी बाजूला असून तेथूनच मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका यांना पाणी जाते. प्रस्तावित भिवंडी महानगरपालिकेचे पाण्याचे तेथे नियोजन आहे.

याचा अर्थ जाणूनबुजून हा फेरफार (manipulate) करण्यात आलेला असून जबरदस्तीने हा प्रकल्प येथे राबविण्याचा घाट आहे.

तरी कुठल्याही परिस्थितीत हा प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही. प्रथम आमच्या ज्या समस्या आहेत, त्या दूर करण्यात याव्यात. आम्ही जमीनी दिल्या, आताशी आमच्या भागात वेअरहाऊसच्या मार्गाने काही प्रकल्प येत आहेत. उशिरा का होईना विकास होऊ शकतो. असे असताना त्या प्रकल्पाच्या शेजारी कचरा डंपिंग आणून विकास कसा करण्यात येईल.

या प्रकल्पाच्या स्थानाच्या बाजूला अँमेझॉन कंपनी आहे, त्यात २,००० लोक काम करत आहेत. जर डंपिंग कचऱ्यामुळे वासाच्या त्रासामुळे अँमेझॉन कंपनी तेथे राहणार का? म्हणजे स्थानिकांचा रोजगारसुध्दा हिरावून घेणार?

आमचे ग्रामस्थ गोडाऊन्समध्ये वेगवेगळ्या संवर्गात (cadre) कामे करत आहेत. तसेच तेथील अप्रत्यक्ष व्यवसायात वाढ झालेली आहे. डंपिंग प्रकल्पामुळे त्यांचा रोजगार जाणार आहे. त्या भागात कुठल्याही प्रकारचा विकास होणार नाही. याची नोंद घेण्यात यावी

हे सर्व आक्षेप लेखी स्वरुपात सादर केलेले आहेत. त्यासह जागतीक आरोग्य संघटनेचा अहवालसुध्दा जोडलेला आहे. त्याचबरोबर या भागात झालेले भूसंपादन त्याबाबत सर्व पुरावे जोडलेले आहेत. जमिन अधिग्रहण करुनही अद्यापपावेतो मोबदला मिळालेला नाही, त्याचेही पुरावे जोडलेले आहेत.

तरी या सर्व बाबींची खात्री व चौकशी करण्यात यावी. हा प्रकल्प कायमचा बंद करण्यात यावा.

ठाणे जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती बघितली, तर असे कितीतरी भाग आहेत, तेथे मानवी वस्ती नाही. तेथे कुठलाही विकास झालेला नाही. त्याठिकाणी हा प्रकल्प का नेत नाहीत? ज्याठिकाणी मानवी वस्ती असून तेथे हजारो लोकांचे व्यवसाय चालू आहे, पिण्याच्या पाण्याचा मोठा साठा आहे, आम्ही मुंबई, ठाण्याला पाणी पुरवितो, तर याचे भान ठेवण्यात यावेत.

तरी ठाणे महानगरपालिकेला इशारा देण्यात येत आहे की ज्या ठिकाणातून आपण पिण्याचे पाणी नेतात, त्याच ठिकाणी आपण घाण करु नये.

मी ज्या लेखी सूचना, मत किंवा आक्षेप नोंदविलेले आहेत, त्याचा लेखी स्वरुपातच खुलासा/उत्तर देण्यात यावे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की डॉ. घनश्याम पाटील यांनी उपस्थित केलेल्या लेखी मुद्यांची नोंद घेण्यात आलेली असून दोन सूचना/मुद्यांचे उत्तर देत आहे. त्यावेळी उपस्थितांनी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देण्यावर आक्षेप घेतला.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की प्रकल्प प्रवर्तक ठाणे महानगरपालिका यांनी अटकोली गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे येथे एकात्मिक/समन्वित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणी नियोजित केलेली आहे. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार विशिष्ट प्रकल्पांना प्रकल्प उभारणीपूर्वी पर्यावरण अनुमती (ईसी) प्राप्त करणे बंधनकारक असून त्याअगोदर संबधित प्रकल्पास पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे बंधनकारक आहे.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा मूळ उद्देश हा प्रकल्प प्रभाव परिसरातील जनतेस प्रस्तावित प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम/प्रभाव व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

बैठकीच्या सुरवातीस आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितलेले आहे की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती ही कुठलाही प्रकल्प मंजूर करत नाही, प्रकल्प नाकारत नाही, प्रकल्पाची शिफारसही करत नाही.

आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना, विचार, हरकती किंवा आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येतो. ते इतिवृत्त अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण, मुंबई यांच्यातर्फे महाराष्ट्र शासनास सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

तरी उपस्थितांना विनंती आहे की प्रश्न विचारण्यापूर्वी प्रश्नकर्त्याने प्रथम आपले संपूर्ण नांव, राहण्याचे ठिकाण सांगावे. तसेच प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक प्रश्नच मुद्देसुदपणे विचारण्यात यावा. मूळ प्रश्न मुद्देसुद्द विचारल्यास तो वगळला (स्कीप) जाणार नाही. प्रस्तावित प्रकल्पाविषयी जनभावना ही शासनास कळविण्यासाठीच ही बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. तरी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप उपस्थित करण्यात यावेत. त्यांचा निरसन करण्याचा निश्चितच प्रयत्न करण्यात येईल.

३) **येथे ॲड. संदीप मंगल जाधव, राहणार-आमणे गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे यांनी** मत मांडले की येथे जे उपस्थित आहेत, त्यांचा एकच प्रश्न नाही. आम्ही येथे राहणारी लोक असून आम्ही लेखी सूचना किंवा आक्षेप नोंदविलेले आहेत. त्यास लेखीस्वरुपातच उत्तर देण्यात यावे. जो ईआयए अहवाल उपलब्ध करण्यात आला, त्या अहवालाविषयीच शंका आहेत. मात्र अहवाल सर्वांनी वाचलेला आहे, ग्रामपंचायतीतसुध्दा वाचलेला आहे.

४) **श्री भास्कर दामोदर माळी, राहणार-सापे गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे:-**

येथे सापे ग्रामपंचायतीचे सरपंचसुध्दा आलेले आहेत. डंपिंगसाठी येणाऱ्या सर्व गाड्या या सापे गावातूनच येतात. गाड्या जात असताना त्यातून प्रचंड प्रमाणात वास येत असतो. गाडी गेली तरीही वास येत असतो. माणसाच्या विष्ठेचा, मलमुत्राचा वास येत असतो. दिवसाला कमीतकमी ५० गाड्या जात असतात. माझी पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीस विनंती आहे की आपण आमच्या सापे गावात येऊन खातरजमा करुन घ्यावी. आमचा या प्रकल्पास आक्षेप आहे. आमच्या सर्वांचीच मागणी आहे की डंपिंग ग्राऊंड येथून गेलेच पाहिजे.

५) **श्री भगवान पांडुरंग सांबरे, ग्रामपंचायत कुरुन, गाव-वाफाळे, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे:-**

प्रथम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केली, त्याबद्दल त्यांचे आभार आणि प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार मे. ओपन आर्च डिझाईन एन्ड एन्वायरो सोल्युशन्स एलएलपी यांचा निषेध व्यक्त करतो. ही जनसुनावणी प्रश्न-उत्तर या पध्दतीने कार्यान्वित रहावी असे मला वाटते.

श्री सांबरे यांनी प्रश्न विचारला की हा कचरा कोणाचा आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की कचरा हा ठाणे महानगरपालिकेचा आहे.

श्री सांबरे यांनी आक्षेप नोंदविला की तर तो आम्ही का सहन करावा? यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आपण एकत्रित प्रश्न विचारावेत.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की घन कचरा व्यवस्थापन, २०१६ (Solid Waste Management, 2016), तसेच घन कचरा व्यवस्थापन, २०२६ (Solid Waste Management, 2026) अनुसार तसेच "स्वच्छ भारत मिशन" (Swacha Bharat Mission) च्या अंतर्गत प्रत्येक महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायती यांच्या कचऱ्याची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही त्या त्या महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायती यांनी करणे बंधनकारक आहे.

तसेच पुढील बाब म्हणजे घन कचरा व्यवस्थापन, २०२६ च्या नियमांनुसार महानगरपालिकांना असे निर्देश देण्यात आलेले आहेत की महानगरपालिकांनी ग्रामपंचायत हद्दीतील कचरासुध्दा गोळा करावयाचा असून ग्रामपंचायतीच्या कचऱ्याचीसुध्दा शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट ही महानगरपालिका, नगरपालिका यांचीच असणार आहे.

यावेळी श्री भगवान पांडुरंग सांबरे यांनी आक्षेप नोंदविला की हा कचरा ठाणे महानगरपालिकेचा आहे. तर ठाणे महानगरपालिकेने त्यांच्या कचऱ्याची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट ही त्यांच्या क्षेत्रात म्हणजे ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतच लावावी. आमच्या गावात आणून आमच्या आरोग्याशी खेळायचे नाही.

श्री सांबरे यांनी ठाणे महानगरपालिकेच्या भूखंडाच्या क्षेत्रफळाबाबत विचारणा केली. त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, संबंधित भूखंडाचे क्षेत्रफळ ३५ हेक्टर असून ती जमीन महाराष्ट्र शासनाच्या मालकीची आहे.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सांबरे यांना सूचना केली की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अधिसूचना, २००६ नुसार प्रस्तावित प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित केलेली आहे. त्यामुळे स्थानिकांनी, प्रकल्प प्रभावित व्यक्तींनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविणे अपेक्षित आहे. इतर विषयांबाबत जे प्रश्न असतील, त्यास दुसरे व्यासपीठ आहे. जरी उपस्थित केलेल्या सर्व सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात येत असली, तरीही पर्यावरणाव्यतिरिक्त विषयांसाठी दुसरे व्यासपीठ/विभाग आहेत. त्यामुळे प्रकल्प पर्यावरण सल्लागार हे प्रस्तावित प्रकल्पाबाबतचे पर्यावरणाविषयक सूचना, विचार किंवा आक्षेप यांना उत्तरे देतील. जर आपणास पर्यावरण सल्लागार यांनी दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसेल, तर त्याप्रमाणे मत मांडण्यात यावे.

श्री सांबरे यांनी आक्षेप नोंदविताना विचारणा केली की कल्याण येथील आधारवाडी येथे जे डंपिंग ग्राऊंड आहे, त्यामुळे परिसरातील नागरिकांवर झालेला आरोग्यविषयक परिणाम, विशिष्ट आजार उद्‌भवतात का याबाबत शासकीय अहवाल असल्यास तो सादर करण्यात यावा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सांबरे यांना परत विनंती केली की बैठकीत स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे की ही बैठक प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. पर्यावरणाव्यतिरिक्त जर इतर विषयांबाबत प्रश्न असतील तर त्यासाठी संबंधित शासकीय विभागाशी संपर्क करण्यात यावा.

अध्यक्ष यांनी सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अधिसूचना, २००६ च्या निर्देशांनुसार कार्यान्वित आहे. तरी आपण प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक सूचना, मत, हरकती किंवा आक्षेप नोंदवू शकतात. त्याची नोंद घेण्यात येऊन त्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सांबरे यांना सांगितले की जर आपले कल्याण विभागातील काही प्रश्न असतील, तर ते लेखीस्वरुपात बैठकीत सादर करण्यात यावेत. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येऊन आपणास लेखीस्वरुपातच उत्तर पाठविले जाईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सांबरे यांना सांगितले की आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात येईल व त्याचा इतिवृत्तात समावेश करण्यात येईल.

श्री सांबरे यांनी आक्षेप नोंदविला की आमच्या व आमच्या पुढील पिढींच्या आरोग्याशी खेळण्याचा अधिकार या स्वतंत्र भारतात कोणालाही, कोणत्याही यंत्रणेला नाही. चांगला श्वास घेणे, चांगले राहणे हा लोकशाहीने दिलेला अधिकार आहे. तरी शासनाचे प्रतिनिधी म्हणून आमची भावना शासनास कळवावी आणि जर चुकीच्या मार्गाने डंपिंग ग्राऊंड होत असेल तर भविष्यात होणाऱ्या आंदोलनाला सामोरे जायची तयारी ठेवावी.

६) **श्री रमेश गोविंद शेलार, संघर्ष समिती उपाध्यक्ष, अटकोली, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणेः-**

ही जनसुनावणी आयोजित केल्याबद्दल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आभार. तसेच येथे जमलेले ग्रामसेवक, तसेच येथील तेरा गावांचे सरपंच/उपसरपंच या बैठकीस आलेले आहेत, त्यांचे आभार.

ज्यादिवशी ही जागा अधिग्रहित करण्यात आली, त्या दिवसापासून आजपर्यंत संघर्ष चालू आहे. मात्र बैठकीत जी उत्तरे दिली जात आहेत, त्यातील एकही उत्तर आम्हांला मान्य नाही. कारण या डंपिंग ग्रांऊडचा भौगोलिक इतिहास बघितला तर ग्रामपंचायतींची नावे सांगतो – तळवली ग्रामपंचायत- अटकोली गाव हे तळवली ग्रामपंचायतीत आहे. दुसरी ग्रामपंचायत – भदाणे, - भदाणे गावात पाच पाडे आहेत. तिसरी

ग्रामपंचायत – पिसे. याला लगत पिसे ग्रामपंचायतमध्ये पिसे धरण येते. तर ईआयए अहवालात पिसे गावाचा उल्लेख आहे का? ईआयए अहवालात उल्हास नदी दाखविलेली आहे. तसेच अहवालात पिसे डॅमचा उल्लेखच नाही. पुढची ग्रामपंचायत आहे – इरवळी, सावद, आमणे, सापे, खांडवळ, कुकसे, कुरुंद, पडघे, राऊळ. तर कल्याण तालुक्यातील एक ग्रामपंचायत येते ती म्हणजे राळे. कारण ती लगतच आहे. जरी ती नदीच्या दुसऱ्या बाजूला असले, तरीही तेथे दुर्गंधी खूपच जाते. कालच सर्व ग्रामपंचायतींना भेटी दिलेल्या आहेत. सर्वच ग्रामपंचायतींची या प्रकल्पास हरकत आहे. ते लेखीस्वरुपात सादर करण्यात येईल.

तसेच बैठकीचे इतिवृत्त मंजूर झाल्यानंतर आम्हांला त्याची प्रत उपलब्ध करुन द्यावीत.

या डंपिंग ग्राऊंडपासून अटकोली गाव हे फक्त ३७० मीटर अंतरावर आहे. तर डंपिंग ग्राऊंडपासून पिसे डॅम हा फक्त एक कि.मी. दोनशे मीटर अंतरावर आहे. तर पिसे डॅमचे क्षेत्र हे फक्त ३०० मीटर अंतरावर डंपिंग ग्राऊंडपासून आहे.

डंपिंग ग्राऊंडमधील भूगर्भातील पाणी तसेच डंपिंग क्षेत्रातील पाण्याचा निचरा हा पिसे डॅममध्येच जाईल. तेच पाणी ठाणे महानगरपालिका पिण्यासाठी वापरत आहे. आम्हांला कोणतेही उत्तर नको. आम्हांला हे डंपिंग ग्राऊंड नको आहे.

संघर्ष समितीचा उपाध्यक्ष म्हणून सांगतो की वेळ आली तर आम्ही आत्मदहन करणार आहोत. शेवटपर्यंत आम्ही संघर्ष करणार याची नोंद घेण्यात यावी.

तसेच ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही चुकीच्या ठिकाणी लावलेली आहे. प्रकल्पबाधित लोक येऊ नये म्हणून येथे लावण्यात आलेली आहे. डंपिंग ग्राऊडशेजारी, पडघा येथे गोडाऊन होते, तेथे बैठक आयोजित करणे योग्य होते. त्यामुळे प्रकल्प बाधित क्षेत्रातील बरेच लोक विशेषतः महिला येथे येऊ शकल्या नाहीत.

या डंपिंग ग्राऊडचे परिसरातील गावांमध्ये आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. अटकोली गावात चार कॅन्सरचे रुग्ण आहेत. फुफ्फुसाचे आजार झालेली सहा मुले आहेत. ही रोगराई वाढण्यापेक्षा डंपिंग ग्राऊंडला आमचा विरोध आहे.

**७) <u>श्री देविदास मधुकर पाटील, राहणार-सावद, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे:-</u>**

मी या गावात राहणारा एक शेतकरी, नागरिक आहे. आज पंधरा वर्षे झाली, गावातील पाणी वाहून माझ्या शेतात येते. शेतात पीकांची लागवड करता येत नाही. आमच्या सारख्या शेतकऱ्यांवर गुजराती शेठ आमच्या वर दादागिरी करुन आमचे शेत विकत देण्यास जबरदस्ती करत आहेत. आज डोंगरीचा एवढा भाग

फोडला गेला, त्यावर घरे झाली. यावर कोणीही लक्ष देतच नाही. मी जिल्हाधिकारी यांना भेटण्यास गेलो असता मला जाऊन दिले गेलेले नाही. गेले दहा वर्षात आमच्या गावात कुठलेही सामाजिक योजना/काम झालेले नाही. आमचा कचरा हा डोंगरीला टाकण्याचा प्रयत्न केला, तर तो आम्हांला टाकून दिला जात नाही. जर कल्याण गावाचा कचरा भिवंडी गावात टाकता येत असेल, तर तेथील कचरा आमच्या सावद गावातच टाकण्यात यावा. कारण एखाद्या शेतकऱ्याला त्याच्या शेतात कचरा का टाकतो विचारल्यास माझ्या शेतात मी टाकू शकतो असे उत्तर देतात. त्यामुळे दुसऱ्या शेतकऱ्याला त्रास होऊ शकतो. अशा समस्या वाढत गेल्या तर गावात कसे होणार? आम्ही सांगायला गेलो तर पोलिस आडवे येतात.

आज आमचे शेत घेण्यास गुजराती दबाव आणतात आणि पोलिस त्यांनाच सहकार्य करतात. तसेच यासाठी शासकीय अधिकाऱ्यांपर्यंत पोहचू देतच नाहीत.

ग्रामपंचायत शेतकऱ्याचा विषय घेत नाही, पोलिस स्टेशन विषय घेत नाही, तर गरीब शेतकऱ्याने कुठे जायचे?

येथे सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले आपण उपस्थित केलेल्या आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली आहे. तर प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत.

श्री देविदास मधुकर पाटील यांनी आक्षेप नोंदविला की आमच्या गावात दादागिरी करुन कचरा टाकण्यात येतो. एकाने विरोध केल्यास पन्नास मुले एकत्र येऊन आमच्यावर दादागिरी करतात. आमच्या घरी येऊन गुजराती धमक्या देत आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले आपणास पर्यावरणविषयक काही सूचना मांडण्याची संधी देण्यात आलेली आहे. तरी आपण पर्यावरणविषयक सूचना उपस्थित कराव्यात, अन्यथा दुसऱ्या व्यक्तीस बोलण्याची संधी देण्यात यावी.

## ८) **<u>श्री प्रदीप मारुती भोईर, माजी सरपंच, राहणार-अटकोली, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे:-</u>**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय अटकोली येथे रोज शंभर ट्रक्सपेक्षा जास्त कचरा फेकण्यात येतो. त्या गाड्या बंद न करता आणण्यात येतात. त्याची दुर्गंधी सर्व परिसरात येत असते. तरी हा अवैध कचरा टाकणे हे कोणाच्या मान्यतेने करत आहे याची माहिती देण्यात यावी. पर्यावरण सल्लागार हे माहिती देत असताना उपस्थितांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर देण्याची सूचना केली.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे मी आपणास उत्तरे देण्यासाठी आलेलो नाहीत. आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित करत असलेल्या पर्यावरणीय सूचना, विचार किंवा आक्षेप यांची नोंद घेऊन ते शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. आपण उपस्थित करत असलेल्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत असून त्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल. सदरहू सर्व दस्तावेज हा महाराष्ट्र शासनास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीच्या सुरवातीस सांगण्यात आलेले आहे की ही समिती प्रकल्प मंजूर करत नाही, प्रकल्प नाकारत नाही, तसेच प्रकल्पाची शिफारसही करत नाहीत. ही बैठक आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयी ज्या पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविणार आहात, त्याची नोंद घेऊन बैठकीचे इतिवृत्त, आपण सादर करत असलेल्या लेखी सूचनांसह मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या मान्यतेने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना करण्यात येईल तेथील तज्ज्ञ समिती आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेपांची नोंद घेऊन प्रकल्पाबाबत पुढील निर्णय घेईल. तरी आपण प्रस्तावित अटकोली प्रकल्पाबाबत सूचना,आक्षेप,प्रश्न मांडा.

त्यावेळी श्री प्रदीप मारुती भोईर यांनी आक्षेप नोंदविला की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची पूर्व परवानगीशिवाय ठाणे महानगरपालिका अटकोली येथे कचरा कसा टाकू शकते?

आयोजिका यांनी उत्तर दिले की सद्याच्या घडीला एकूण ८५ एकर जागा आहे. त्यातील ३५ एकरमध्ये तो प्रकल्प उभारला जाणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय-ठाणे यांनी ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) अदा केलेले आहे. ती एन.ओ.सी. सर्व खात्यांची परवानगी घेऊन, त्यांच्याशी बैठका, चर्चा करुन तसेच स्थळ पाहणी (Site Visit) करुनच अदा करण्यात आलेली आहे.

येथे श्री प्रदीप मारुती भोईर यांनी आक्षेप नोंदविला की प्रत्यक्षात ठाणे महानगरपालिका प्रशासनाने कधीही स्थळ पाहणी (Site Visit) केलेली नाही. अटकोली गाव हे डंपिंग ग्राऊंड/क्षपण भूमी पासून किती अंतरावर आहे याची कोणीही पाहणी केलेली नाही. हा जो ईआयए अहवाल तयार करण्यात आला, त्यावेळी ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण तपासण्यात आले काय? डंपिंग ग्राऊंड/क्षपण भूमी पासून १.५ कि.मी. अंतरावरील गोरसई गावातील शाळेजवळील नमुने घेतात. तेथे हवा प्रदूषण होते की नाही हे तेथे तपासले जाते. भदाणे येथे येऊन त्यांनी हवा प्रदूषण का तपासले नाही?

या डंपिग ग्राऊंडच्या ६००-७०० मीटर अंतरावरच पिसे धरणाचे धरणक्षेत्र आहे. पिसे धरणात डंपिग ग्राऊंडच्या पाण्याचा निचरा होत आहे. आजूबाजूचे शेतकरी त्यांच्या शेतात शेती करु शकत नाही.

आयोजिका यांनी सांगितले की उपस्थित करत असलेल्या हरकती, सूचना यांची नोंद घेण्यात येत आहे. त्याचा इतिवृत्तात समावेश करण्यात येईल.

श्री प्रदीप मारुती भोईर यांनी आक्षेप नोंदविला की तेथे जो अवैधपणे कचरा टाकण्यात येतो, तो जाळण्यात येतो. याबाबत आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय-ठाणे यांना तक्रारी केलेल्या आहेत. आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनाही तक्रारी केल्या, त्याचे फोटोसुध्दा दिलेले आहेत. कचरा जाळण्याचा दु:ष्परिणाम आम्हांला भोगावाच लागतो. तर ठाणे महानगरपालिकेच्या कचऱ्यासाठी आमची पिढी बरबाद आम्ही करु का? आम्ही आमच्या गावात जेवण करण्यास बाहेरसुध्दा बसू शकत नाही. एवढे डास व माश्या असतात. आम्ही ग्रामपंचायतमार्फत जिल्हा परिषदेला तक्रार केली. जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांनी २१ नोव्हेंबर, २०२५ ला एक अहवाल दिलेला आहे.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपणाकडे जो जिल्हा परिषद आरोग्य विभाग अहवाल व इतर कागदपत्रे आहेत, ती येथे सादर करण्यात यावीत. सदरहू कागदपत्रे इतिवृत्तासोबत शासनास सादर करण्यात येतील.

श्री प्रदीप मारुती भोईर यांनी आक्षेप नोंदविला की आता जेथे कचरा टाकण्यात येतो, तेथे २०-२० फूट पाणी आहे. त्या पाण्यात कचरा टाकतात. ते पाणी पुढे शेतात जाते. आता पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थळ पाहणी करावीत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने काहीही केलेले नाही. तसेच वातानुकुलित खोलीत हा ईआयए अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

श्री प्रदीप मारुती भोईर यांनी जिल्हा परिषद आरोग्य विभाग अहवाल वाचून दाखविताना सांगितले की -

डंपिंग ग्राऊंडवर जो कचरा टाकण्यात येत आहे, त्यावर प्रचंड प्रमाणात माशा आढळून आल्या. तसेच अतिशय दुर्गंधी पसरलेली होती. अटकोली , चिराडपाडा या गावात भेट दिली असता सर्व ठिकाणी खूप प्रमाणात माश्या आढळून आल्या. काही ठिकाणी स्वयंपाकघरात पाहणी केली असता सर्वत्र माश्या आढळल्या. संपुर्ण परिसरात अतिशय दुर्गंधी पसरलेली आहे. डंपिंग ग्राऊंडच्या बाजूला पाणी आहे, तेथील एका भागाचे पाणी पुर्णपणे खराब झालेले आहे. या सर्व बाबी लक्षात घेता सदर परिसरातील गार्डमध्ये माश्यांमुळे अन्न दुषित होऊन तसेच अनेक प्रकारचे आजार होण्याची दाट शक्यता आहे. भविष्यात आजूबाजूचे पाणी स्त्रोत दुषित होऊन मोठ्या प्रमाणात जलजन्य आजाराची शक्यता आहे. डंपिग ग्राऊंडच्या

ठिकाणी जो कचरा आहे, त्यावर नियमित औषध फवारणी करणे, दररोज टाकणाऱ्या कचऱ्यावर मातीचा थर टाकणे गरजेचे आहे. आरोग्य विभाग-भिवंडी पंचायत समिती २१-११-२०२५ चे पत्र आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की माझी जी ओपन आर्च डिझाईन एन्ड एन्वॉयरो सोल्युशन्स कंपनी आहे. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अधिसूचना, २००६ नुसार भारत सरकारने वेळोवेळी पारित केलेले निर्देशांनुसार QCI NABET कडून मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागारच ईआयए अहवाल बनवू शकतात.

तसेच ईआयए अधिसूचना, २००६ नुसार ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. त्यानुसार ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आलेली असून या समितीस आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित करत असलेल्या सूचना, आक्षेप नोंदवून घ्यायचे आहेत. आपण आपल्या सूचना/आक्षेप लेखी स्वरुपातही नोंदवू शकता.

येथे पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की येथे सर्व उपस्थित डंपिंगबाबत आक्षेप नोंदवित असून ते योग्य आहे, मात्र ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही डंपिंगसाठी नसून लँड फीलसाठी आहे. आतापर्यंत झालेला डंप हा संपूर्णपणे नाहीसाच करायचा आहे.

श्री प्रदीप मारुती भोईर यांनी आक्षेप नोंदविला की मागच्या वर्षी हेच उत्तर ठाणे महानगरपालिकेने दिलेले होते. मात्र ते वर्षभर फक्त कचरा डंपच करत आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की २०२४ पासून याबाबत पुढील प्रक्रिया ही सुरु झालेली आहे. शासनाने प्राथमिक मान्यता (टी.ओ.आर.) दिनांक २०/१२/२०२४ रोजी मंजूर केलेला आहे. पर्यावरण अनुमतीची ही प्रक्रिया असते. येथे पर्यावरणविषयक जनसुनावणी झाली नाही, तर त्या लँड फिलला पर्यावरण अनुमती (ईसी) मिळणारच नाही. कचरा टाकण्याचे थांबविले तरीही तेथील कचरा उचलला जाणार नाही.

पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे सर्व प्रक्रिया दररोज करण्यात येईल. त्यामुळे स्थानिकांना होणारा माश्यांचा, डासांचा त्रास हा नाहीसा होईल. परिसरात राहणाऱ्या लोकांच्या आरोग्याबाबतही येथे विचार करण्यात आलेला आहे. तसेच येथील पुढच्या पिढीला त्रास होणार नाही, याबाबत व्यवस्थापन करण्यात आलेले आहे.

श्री प्रदीप मारुती भोईर यांनी मागणी केली की तोपर्यत येथे कचरा टाकण्यात येऊ नये. त्याचे दु:ष्परिमाण आम्ही भोगत आहोत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की याची नोंद घेण्यात आलेली आहे.

श्री प्रदीप मारुती भोईर यांनी जोरदार मागणी केली की येथे कचरा टाकणे ताबडतोब बंद झाले पाहिजे. तसेच हा ईआयए अहवाल बनविला, तो बोगस असून आम्हांला मान्य नाही. अटकोली गाव, वाशेरे गाव, फुलेरो पाडा, चिराडपाडा येथे प्रत्यक्ष भेट देऊन बघा. ही कळकळीची विनंती. तोपर्यंत कचरा टाकणे बंद करा.

**९) श्री विनोद गणेश शेलार, राहणार-वाशेरे गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणेः-**

बैठकीत प्रश्नास उत्तर देताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की पर्यावरण सल्लागार हे प्रस्तावित प्रकल्पाबाबत फक्त पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप याबाबत उत्तर देतील. पर्यावरणाच्या शिवाय इतर विषयांवर उत्तर देण्यास सक्षम नाहीत. माझे म्हणणे आहे की जर ते सक्षम नाहित, तर त्यांना खाली बसवावे.

माझा पहिला प्रश्न आहे की आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी हा भूखंड गावात चर्चा करुन हस्तांतरित केला. तर ज्या बैठका झाल्या, त्या सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात झाल्या. जर जमिन अटकोली गावाची होती, तर तळवली ग्रामपंचायतीचासुध्दा विचार करणे गरजेचे होते. त्याबाबत जिल्हाधिकारी यांनी विचार केलेला नाही. जर डंपिंग करण्यात येते, तेथे ग्रामपंचायतीचीसुध्दा ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. ती घेतलेली नाही.

आमच्या गावात इंडिजिनेस कंपनीचा प्रकल्प असून तो डम्पिंग साइटपासून अवघ्या १०.० मीटर अंतरावर आहे. या प्रकल्पात अनेक स्थानिक कामगार कार्यरत आहेत. त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार?

आमच्या येथे बोअरवेल आहे. पुर्वी चांगले पाणी येत असे. मात्र आता अशुध्द पाणी येते. त्यामुळे आम्हांला आरोग्याबाबत प्रश्न हे उपस्थित होणार आहेत. याची जबाबदारी कोण घेणार आहे?

बैठकीत कल्याणच्या डंपिंगचा विषय उपस्थितांनी सांगितला. तर कल्याण येथील डंपिंगजवळील बिल्डर्स हे तोट्यात गेलेले आहेत. जर येथील डंपिंग प्रकल्प सुरु केला, तर आमचा वाशेरे येथील गृहनिर्माण प्रकल्प तोट्यात जाऊ शकतो. तसेच एक लाख लोकांचा रोजगार येथून हिरावून घेतला जाऊ शकतो, याची नोंद घेण्यात यावी.

आयोजिका यांनी मत मांडले की आतापर्यंत ज्या सूचना, आक्षेप नोंदविण्यात आले, त्याव्यतिरिक्त जर कोणाचे नविन प्रश्न असतील, तर ते विचारण्यात यावेत.

**१०) <u>श्री कपिल ढमणे, राहणार-चिराडपाडा, गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे:-</u>**

सादरीकरणात काही गोष्टी सांगितल्या. त्याआधीसुध्दा त्याबाबत चर्चा करण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तक अटकोली गावात या प्रकल्पाची उभारणी करणार आहे. सादरीकरणात प्रकल्प स्थानाचे निकष (site selection criteria) दर्शविलेले आहेत. तर प्रकल्प उभारणीचे स्थान हे प्रथम स्थळाची पाहणी करुन निवडण्यात आलेले आहे काय किंवा नकाशावरुन निवडण्यात आलेले आहे.

कारण आपण जर प्रकल्प स्थळाची पाहणी केली तर असे दिसून येते की तेथील पाण्याचा प्रवाह हा नदीकडे जाणारा आहे. प्रकल्प स्थानापासून नदीचे बॅक वॉटर हे फक्त ५००.० मीटर अंतरावर आहे. म्हणजे ५००.० मीटर अंतर असो किंवा ५.० कि.मी. अंतर असो, जर चिराडपाडा व अटकोली भागात नदीत प्रकल्पातील कचऱ्याचे सांडपाणी जाणार व त्यामुळे नदी प्रदूषित होणारच आहे. प्रकल्प स्थानाच्या नैसर्गिक रचनेनुसार पाणी हे नदीकडेच वाहणार आहे. त्याबाबतच्या उपाययोजनांचे स्पष्टीकरण देण्यात यावे.

दुसरा प्रश्न - सादरीकरणात सांगण्यात आले की प्रकल्प स्थानाच्या १०.० कि.मी. परिघात आपण पाण्याचे बरेच नमुने गोळा केले, तेथे जल प्रदूषण आढळून आलेले नाही. ठाणे व मुंबई महानगरपालिकेला या पिसे धरणातूनच पाणी दिले जाते. जर पाऊस आला नाही, तर पाणी कोठून देणार आहात? तर माझी सूचना आहे प्रकल्प स्थळाचे रुपांतर हे कचरा डेपो न करता पाण्याचे साठवण (water storage) करण्यासाठी विकसित करण्यात यावे. म्हणजे ठाणे महानगरपालिके बरोबरच आजूबाजूच्या गावांनाही पिण्याचे पाणी मिळेल. कारण प्रकल्प स्थानाजवळ आमच्या गावाची सामाईक जमिन आहे.

पुढील प्रश्न - जेथे प्रकल्प उभारणी करणार आहेत, तेथे खाणी आहेत. त्यांची किती खोली आहे? तेथील खाणीत नैसर्गिक स्थितीने पाणी खालच्या बाजूसच जाणार आहे. त्याबाबत काही नियोजन केले असल्यास त्याचे स्पष्टीकरण.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की आपला पहिला प्रश्न हा ड्रेनेजबद्दल होता — नैसर्गिक स्थितीमुळे पाणी वाहून नदीकडे जाणार. सादरीकरणात गारलँड ड्रेन्सबाबत माहिती दिलेली आहे. प्रकल्पाच्या चारी बाजूने स्ट्रॉम वॉटर ड्रेन / पावसाचे पाणी वाहते, त्यासाठी गारलँड ड्रेन्स (संकलन बिंदू) बांधण्यात येतील. त्या गारलँड ड्रेन्स जो collection point आहे, तेथे नैसर्गिक स्लोपचा वापर करुन म्हणजे प्रकल्प स्थानाच्या आत जो lowest level असणार आहे, तेथेच फिल्ट्रेशन चेंबर तयार करण्यात येईल.

त्यामुळे कोणत्याही परिस्थिती प्रकल्पातील पाणी बाहेर वाहून जाणार नाही. त्यामुळे प्रकल्पातून नदीकडे कोणत्याही प्रकारचे पाणी जाणार नाही. त्याबाबतचे सर्व नियोजन करण्यात आलेले आहे.

दुसरी सूचना करण्यात आली की तेथे खाणी आहेत. तर ते सत्य आहे. त्यावेळी काही उपस्थितांनी एकत्रित ईआयए अहवाल हा चुकीचा आहे असे सांगितले.

श्री कपिल ढमणे यांनी आक्षेप नोंदविला की प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरातील भूगर्भातील पाण्याचे स्रोत हे निश्चितपणे प्रदूषित होणार आहेत. सर्वांसाठी पाणी अत्यंत महत्वाचे आहे. तरी प्रकल्प स्थानाचा कचरा डंपिंग न करता पाणी साठवणीसाठी वापर करण्यात यावा.

**११) श्री राम दळवी, राहणार-आमणे, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणेः-**

मी ग्रामपंचायत आमणे व ग्रामपंचायत फुलारी पाडा यांच्या वतीने बोलत आहे. आम्ही एकूण १७ शेतकरी आहोत. आमच्या १७ शेतकऱ्यांची ३५ एकर जागा आहे. या कचऱ्यावर केमिकल मारले जाते. तेथील पाण्याचा निचरा आमच्या शेतात येतो. ३५ एकर जागेतील २२ एकर जागेत आमची भातशेती आहे. मागच्या वर्षी फक्त दोन एकरच भातशेती लावली. मात्र आमच्या शेतात उतरता येतच नाही, एवढा केमिकल्सचा निचरा आमच्या शेतात होतो. मागच्या जुलै महिन्यात मंडळ अधिकारी, तलाठी यांनी तेथे येऊन पंचनामा केला. त्याचे उत्तर व मोबदला अद्यापपावेतो प्राप्त झालेला नाही.

या प्रकल्पामुळे आम्हांला जो त्रास व नुकसान होत आहे, ते आम्ही किती सहन करायवयाचे आहे? ठाणे महानगरपालिकेला कचरा टाकण्यासाठी एवढीच जागा आहे काय?

आमच्या फक्त सतरा शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही, तर आजूबाजूच्या सर्व ग्रामपंचायतमधील सर्व ग्रामस्थांना कचऱ्याच्या दुर्गंधीचा त्रास होत आहे. उन्हाळ्यात कचऱ्यास आग लावतात, पण पावसाळ्यात तो कुजुन जातो. तो आमच्या शेतात जातो. त्यामुळे आजूबाजूच्या अनेक लोकांचे नुकसान होत आहे. प्रकल्प स्थानजवळ माझे कॅन्टीन आहे. पावसाळ्यात माश्यांचे साम्राज्य असते. तेथे उभे राहता येत नाही. त्यामुळे प्रकल्प स्थानाच्या आजूबाजूस जे प्रकल्प आलेले आहेत, ते तेथे कसे चालतील, ते बंद करावे लागतील. आमची व्यवसायाची एकमेव जागा होती, ती आपण कचऱ्यासाठी घेतली, तर आम्ही कसा व्यवसाय करायचा. आमच्या विहिरीत दुर्गंधीयुक्त पाणी येत आहे. तरी याबाबत उत्तर देण्यात यावे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आपला प्रश्न बरोबर आहे. हे जे डंपिंग ग्राऊंड आहे, त्यास एकच उपाय म्हणजे सॅनिटरी लँड फिल (Sanitary Land Fill) प्रकल्प उभारणी. आतापर्यंत जे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत, ते डंपिंगबाबत घेतलेले आहेत. आम्हाला ही डंपिंग नको आहे, पर्यावरण अनुमती

ही सॅनिटरी लँड फिल (Sanitary Land Fill) प्रकल्प उभारणी करता आहे. जो कचरा टाकलेला आहे, त्याची शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लाऊन त्याचे खतात रुपांतर करण्यात येईल. तो डंप उचलून तेथे विंड रोझ कंपोस्ट करणे, तसेच कचऱ्यापासून उर्जा (Waste to Energy), तसेच Material Recovery Facility, तसेच जिथे खाण आहे, त्यात कुठलीही प्रक्रिया न होणारा कचरा टाकून तेथे हरितपट्टा विकास करण्यात येईल.

स्थानिकांना डंपिंगबाबत घेतलेले आक्षेप योग्य आहेत. तो डंप कचरा तेथून शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट/नष्ट करायचा आहे. तेथे जो खड्डा आहे, त्याचे पुनर्भरण करुन तेथे लँड फील करायची आहे. कचऱ्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. यात खत निर्मिती, बायो-गॅस निर्मीती त्याचा इंधन म्हणून वापर करता येईल यासाठीच ही जनसुनावणी आहे. भारत देशात हे तंत्रज्ञान विविध ठिकाणी राबवत आहेत.

१२) **श्री संदीप शेलार, राहणार-अटकोली गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणेः-**

मी शेतकरी आहे. प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की अत्यंत आधुनिक तंत्रज्ञान या प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येणार आहे. तर ते तंत्रज्ञान/प्रक्रिया ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातच का राबवत नाही?

या कंपनीने व ठाणे महानगरपालिकेने गृहित धरलेले आहे की आम्ही ग्रामीण भागातील लोक हे जनावरे आहेत. ठाणे शहरात माणसे राहतात, तर येथे माणसे राहत नाहीत का? जर येथे टाकणाऱ्या कचऱ्यापासून काहीही दुर्गंधी पसरणार नाही, तर सर्व अधिकाऱ्यांनी, सर्व ठाणे महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी महिनाभर येथे येऊन राहावे. पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीच्या अधिकाऱ्यांना विनंती आहे की आपणही एक दिवस राहा, म्हणजे आमचा त्रास तुम्हांला कळेल.

१३) **श्री राजाराम गोपाळ शेलार, राहणार-अटकोली गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणेः-**

अधिकाऱ्यांना विनंती, ते आम्हांला प्यायचे पाणीसुध्दा देणार नाही, तर आपणास एक महिना फुकट खोली देण्यात येईल, त्यांनी येथे राहून दाखवावे.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की ज्यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवायचे आहेत, त्यांनी ते महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधीकडे द्याव्यात. त्याची पोच देण्यात येईल. तसेच प्रस्तावित प्रकल्पाविषयी ज्यांना ईमेलव्दारे अजूनही सूचना/आक्षेप नोंदवायचे असतील, त्यांनी ते

srobhiwandi@mpcb.gov.in किंवा rokalyan@mpcb.gov.in यावर पोस्ट करु शकतात. बैठकीच्या इतिवृत्तासोबत ते शासनास सादर करण्यात येतील.

**१४) <u>ॲड. बळवंत जोशी, राहणार-आमणे गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे:-</u>**

बैठकीत प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यात आले. त्यात येथील कचऱ्यावर शास्त्रीयदृष्ट्या विल्हेवाट लावणे, वेस्ट टू एनर्जी प्रकल्प व सॅनिटरी लँडफील साईट याबाबत माहिती देण्यात आली. तरी आम्ही सर्व ग्रामस्थ या प्रकल्प उभारणीस नामंजूर आहोत. या प्रकल्पास आमचा पुर्ण विरोध आहे.

हा ईआयए अहवाल चुकीचा आहे. येथे धादांत खोटी माहिती सांगण्यात येत आहे. या प्रकल्प स्थानापासून ४००-५०० मीटर अंतरावर घरे आहेत. अटकोली ची घरे आहेत. मागच्या वर्षी तेथे चार-पाच हजार लोकांची जाहिर सभा झालेली आहे. सर्व पक्षांचे लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासनाचे प्रतिनिधी व अधिकारी, तसेच आजूबाजूच्या गावातील ग्रामस्थ हे उपस्थित होते. तर जनेचा आक्रोश समजून घ्या. याठिकाणी मी मुद्दे मांडत आहे –

अ) मुळात ठाण्याचा कचरा येथे आणणे आम्हांला मान्य नाही, याची नोंद घेण्यात यावी.

ब) जमीनीचे जे हस्तांतरण केलेले आहे, ते वेगवेगळ्या कारणांसाठी हस्तांतरीत केलेली आहे. ही जागा हस्तांतरित करताना स्थानिक ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला घेण्यात आलेला नाही. ठाणे महानगरपालिकेचे डंपिंग या जागेवर मनमानी पध्दतीने चालू आहे.

क) येथून पिण्याचे पाणी घेऊनच याच ठिकाणी घाण टाकणार. माझी उप जिल्हाधिकारीसाहेब व पाटील मॅडमला विनंती आहे की आपण प्रत्यक्ष एक दिवस जागेवर काढून दाखवा. तेथे दिवस-रात्र आपल्या घरातील ज्या महिला राहतात, त्यांना किती त्रास होत असेल याची जाणीव ठेवावी.

ड) सादरीकरणात वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाबाबत माहिती देण्यात आली. मात्र येथे इलेक्ट्रॉनिक्स कचऱ्याचे प्रक्रियेबाबत नियोजन झालेले नाही. पूर्वी आमणे गावातील नदीचे पाणी लोक प्यायचे, त्यावर शेती व्हायची. त्याशिवाय तेथे मासेमारी करुन लोक पोट भरत होते. आता आमणे नदीचे पाणी हे शेतीलासुध्दा वापरता येत नाही. येथील सरपंच श्री दळवी यांच्या शेतातून क्रुड ऑईल जसे येते, तसे गढूळ पाणी येत असते. येथील जमिन एक वर्षात नापीक होते.

इ) ठाणे महानगरपालिका ही श्रीमंत महानगरपालिका आहे. तर सिंगापूरच्या धर्तीवर ठाणे महानगरपालिका क्षेत्रात घन कचरा व्यवस्थापन का करत नाहीत? सिंगापूरमध्ये कचऱ्याचे व्यवस्थापन हे त्याच शहरात करण्यात येते. तेथे कुठेही दुर्गंधी दिसत नाही. तशी प्रक्रिया ठाणे महानगरपालिकेने त्यांच्या हद्दीतच राबवावी.

त्यामुळे तेथे दुर्गंधी येणार नाही, तसेच आरोग्याचा प्रश्नसुध्दा निर्माण होणार नाही. तसेच नॉर्वे शहराप्रमाणे कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात यावे.

ई) पुढील मुद्दा - भविष्यासाठी कचरा व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र उभारणार आहात. त्याच्या अगदी बाजूनेच गॅसची पाईपलाईन गेलेली आहे. आणि गॅस पाईपलाईन्सच्या पलिकडे ठाणे ग्रामीण पोलिस मुख्यालय आहे. त्यासाठी ५४ एकर जागेचे हस्तांतरण झालेले आहे. बाजूला पिसे डॅम आहे, लॉजिस्टीक पार्क आहे. स्थानिक शेतकऱ्यांना अनंत वर्षे संघर्ष करुन समृध्दी आलेली आहे. तर आता परत त्यांच्या प्रगतीत, समृध्दीत अडथळा निर्माण करणार आहात का? समृध्द होत असलेला परिसर हा परत उध्वस्त करण्याचा घाट दिसत आहे.

उ) मध्य प्रदेशातील इंदौरचे आयुक्त आलेले होते. त्यांनी पाच वर्षात इंदौर शहर हे भारतातील सर्वात सुंदर, स्वच्छ शहर बनविले. त्यांना ठाण्याला बोलावून त्यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

तरी कचरा व्यवस्थापन करताना तेथील गावे उध्वस्त होणार नाहीत, शेतकरी, कामगार उध्वस्त होणार नाहीत याचे भान ठेवावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की बरेच मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. अजूनही कोणालाही प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, विचार किंवा आक्षेप नोंदवायचे असतील, तर ते त्यांनी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्याण तसेच उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भिवंडी यांना ईमेलव्दारे सादर करु शकता.

उपस्थितांनी प्रदूषणाचे, आरोग्याचे, शेती, विहिरी प्रदूषणाचे मुद्दे मांडलेले आहेत. या प्रकल्पाशेजारीच पिसे डॅम आहे, हा मुद्दा अहवालात नाही या आक्षेपाची नोंद घेण्यात आलेली आहे. उपस्थितांनी ईआयए अहवाल चुकीचा, त्रुटी असलेला व सर्वेक्षण योग्य प्रकारे न करता तयार करण्यात आला या आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली आहे. या मुद्यांव्यतिरिक्त जर कोणाला प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्यात यावेत.

१५) **<u>ॲड. संदीप मंगल जाधव, राहणार-आमणे गाव, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे:-</u>**

येथे उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपल्या भावना पोटतिडकीने मांडलेल्या आहेत. अगदी प्रामाणिकपणे भूमिका मांडलेली आहे. त्यांचे दु:ख आपल्याला कळले असेल. समाजातील तळागाळाच्या लोकांच्या अडचणी या तेथे पाहणी, चर्चा केल्यानंतरच कळतात.

ज्या कंपनीने हा पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआयए) अहवाल तयार केला, ही खाजगी कंपनी आहे. तसेच माझ्या मते हा अहवाल भारत सरकारच्या प्रयोगशाळेने देणे अपेक्षित होते. तसेच या खाजगी कंपनीच्या अहवालाचे परत पडताळणी होणे आवश्यक होते. ठाणे महानगरपालिकेकडून संबंधित ईआयए अहवालाची पुनर्पडताळणी करणे आवश्यक होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ईआयए अहवालाची पुनर्पडताळणी केली असल्यास तो अहवाल आम्हांला उपलब्ध करुन देण्यात यावा.

तरी या प्रकल्पास स्थानिकांना पूर्णपणे विरोध आहे हे मी परत प्रतिपादन करत आहे. हा प्रकल्प येथे येऊ नये, तो रद्द व्हावा यासाठी गेले दीड-दोन वर्षे आम्ही संघर्ष करत आहोत. २२ एप्रिल, २०२४ ला ही जागा ठाणे महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी ठाणे महानगरपालिकेला अठरा अटी व शर्ती पारित केल्या. त्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता झाली, तर ती जागा वापरण्यात यावी असे स्पष्ट आदेश देण्यात आलेले आहेत. मात्र ठाणे महानगरपालिकेने त्यातील बऱ्याच अटी व शर्तींचा भंग केलेला आहे. बऱ्याच अटी व शर्तींची पूर्तता केलेली नाही. असे असतानाही तेथे गेले दीड वर्षे अवैधपणे डपिंग चालू आहे. म्हणजे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची, स्थानीक ग्रामपंचायतीची पूर्वपरवानगी घ्यायची नाही, जबरदस्तीने येथे कचरा टाकण्यात येत आहे. ही आमच्यावर लादण्यात आलेली हुकूमशाही आहे.

तरी आमची मागणी आहे की मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी पारित केलेल्या आदेशाची पूर्णपणे अंमलबजावणी (Compliance) व्हावी. बेकायदेशीरपणे डंपिंग चालू आहे, दिवसाला १००-१५० गाड्या येतात.

ईआयए अहवालात प्रस्तावित प्रकल्प किती चांगला असे लिहिलेले आहे. प्रकल्प सुरु झाल्यानंतर प्रथम होईल ते म्हणजे जल प्रदूषण. तर जी जागा या प्रकल्पास अदा करण्यात आलेली आहे, ती खदानीची/खाणीची जागा आहे. त्यात पाणी आहे. ठाणे शहराचा जैविक कचरा (Bio-Medical Waste) येथे आणून टाकतात.

ठाणे महानगरपालिका त्यांच्या कचऱ्याचे विघटन करतच नाही. ठाणे महानगरपालिकेने कचऱ्याचे वजन करायचे आहे. तर ओला व सुका कचरा याचे वर्गीकरण करुन ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करावयाची आहे. तसेच उरलेला कचरा आहे, त्याची वैज्ञानीकदृष्ट्या सॅनिटरी लँड फील करायचे आहे. तर मागच्या दीड वर्षात झाले का? तर उत्तर नाहीच येईल. या कायदेशीर भूमिका ऐकावयालाच लागेल. जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांसाठी काहीही केले नाही. ही परिस्थिती गंभीर आहे.

या डंपिंग ग्राऊंडच्या लगतच रेनॉसिस नावाची स्मार्ट एमआयडीसी आहे. तेथे कित्येक हजारो लोक काम करत आहेत. जर कचरा डेपोमुळे ते कारखाने बंद केले, तर स्थानिकांचा रोजगार जाईल.

ईआयए अहवालात उल्लेख आहे की सामाजिक व आर्थिक सलोखा टिकविण्यात येईल.  तर तो कसा टिकवणार आहात?

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ॲड. संदीप मंगल जाधव यांना विनंती केली आपण जे लेखी निवेदन वाचून दाखवत आहेत, ते जर सादर केले तर प्रत्येक मुद्यांवरचे आपले स्पष्टीकरण महाराष्ट्र शासनास सादर करण्यात येईल.

श्री जाधव यांनी सांगितले की लोकांना आमची भूमिका कळावी म्हणून हे वाचून दाखवत आहे.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री जाधव यांना सूचना केली की आपण लेखी निवेदन सादर करावेत.  म्हणजे इतरांनाही त्यांच्या सूचना, मुद्दे उपस्थित करण्यास वेळ देता येईल.

त्यावेळी एका उपस्थितांनी विनंती केली की श्री जाधव आमच्या संघर्ष समितीचे अध्यक्ष आहेत. तर त्यांना बोलू द्यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री जाधव यांना सूचना केली की आपण मुद्दे मांडा, म्हणजे ते मला शासनास कळविता येतील.

श्री जाधव यांनी सांगितले की हे लोकांचे मुद्दे असून लोकांच्या भावनांशी निगडित आहेत.  ईआयए अहवालात चुकीच्या गोष्टी लिहिल्या आहेत, ते आम्हांला सर्वासमक्ष सांगावेच लागेल.  आता ईआयए अहवालात लिहिलेले आहे की अटकोली  गाव हे ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासकीय हद्दीत येते.  तर ठाणे महानगरपालिकेची हद्द ही कळव्याला संपते.  अटकोली  गाव हे प्रशासकीयदृष्ट्या भिवंडी तालुक्यात आहे. तर या अहवालात ते खोटे कसे सांगतात.

श्री जाधव यांनी आक्षेप नोंदविला की ठाणे ते अटकोली  येथील अंतर रस्त्याने एकतर्फी ४५-५० कि.मी. आहे.  तेवढेच्या अंतरावर ती परत जाते.  तर यांना यांच्या बाय लॉजप्रमाणे कचरा कसा न्यावा याचे निर्देश दिलेले आहेत.  तर या गाड्या ठाण्याहून उघड्या आणतात.  येताना कचरा रस्त्यात, कारवर, दुचाकीस्वाराच्या अंगावर पडतो.  जर हे नियमांचे उल्लंघन करत असतील, तर हा प्रकल्प रद्द करण्याचे काम आपले आहे.  तर ईआयए अहवाला चुकीचा आहे याची नोंद करुन घेण्यात यावी.

प्रकल्पात स्पष्ट उल्लेख केलेला आहे की प्रकल्प स्थानापासून १.३१ कि.मी. अंतरावर उल्हास नदी आहे.  तिचा प्रवाह उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहतो.  तर उल्हास नदी कुठे, भातसा नदी कुठे, त्यांच्या सीमा कोठे हेच पर्यावरण सल्लागार यांना माहित नाही.

वस्तूस्थिती अशी आहे की या प्रकल्प स्थानापासून १.० कि.मी. अंतरावर पिसे डॅम आहे. पिसे डॅमच्या बुडित क्षेत्रात जुपाडा, चिराडपाडा, भदाणे, अटकोली ही चार गावे येतात, माझ्याकडे सातबारा आहे. या डंपिंग प्रकल्पापासून सातबारा आहे, जो बृहन्मुंबई महानगरपालिकेने संपादित केलेले आहे. पावसाळ्यात ही चारही गावे बुडतात. संपूर्ण डंपिंगचा कचरा नदी, नाल्यातून गावात जातो. पिसे गावाचे दुषित पाणी आम्ही पितो. पिसे डॅमचा फिल्ट्रेशन प्लँट हा भांडुपला आहे. म्हणजे पिसे डॅमचे दुषित पाणी आम्ही गावातील लोक पितो. ईआयए अहवालात खोटी माहिती दिलेली आहे की १० कि.मी. परिसरात नदी नाही. भातसा नदी, आमण्याची नदी, उल्हास नदी अशा बऱ्याच नद्या आहेत.

दुसरा चुकीचा ईआयए अहवालात उल्लेख की १० कि.मी. परिसरात कुठलाच पाण्याचा स्रोत नाही. म्हणजे १० कि.मी. परिसरात तलाव, नदी, बोअरवेल, पाण्याचे नैसर्गिक स्रोत, धरण नाहीत असा अर्थ होतो. आमच्या आमणे गावात तीन तलाव आहेत. आमणे व अटकोली यांचे अंतर फक्त १.५ कि.मी. आहे. चुकीच्या ईआयए अहवालाने ते पर्यावरण अनुमती प्राप्त करत असतील, तर ते पूर्णपणे चुकीचे आहे. कायद्याला व आम्हांला हा प्रकल्प मान्य नाही याची नोंद आपण करुन घ्यावी.

ईआयए अहवालात उल्लेख आहे की प्रकल्प स्थानापासून २०० मीटर्स अंतरावर वस्तीच नाही. तर या प्रकल्प स्थानापासून २०० मीटर्सच्या अंतरावर पिसे ग्रामपंचायतीची फुलोरा पाडाची आदिवासी समाजाची शंभर घरांची वस्ती आहे. अहवालात खोटी माहिती देतात की २१० मीटर्स अंतरावर कोणतीच वस्ती नाही. निव्वळ खोटा अहवाल सादर केलेला आहे. अशा चुकीच्या ईआयए अहवालास आमचा विरोध आहे. पर्यावरणाची १००% हानी होणार आहे.

हा ईआयए अहवाल आम्हांला cross verification करायचे आहे. तरी व्हिडिओ शुटिंगची एक कॅसेट, इतिवृत्त व लेखी सूचना/आक्षेप यांना आपण दिलेली उत्तरे ही आम्हांला उपलब्ध करुन देण्यात यावे.

तसेच मा. अध्यक्षांच्या अखत्यारित विषय असल्याने मी मागणी करतो की अवैध डंपिंग त्वरित बंद करण्यात यावे.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी ॲड. संदीप जाधव यांना अतिशय मुद्देसुद सूचना उपस्थित केल्याबद्दल त्यांचे आभार मानले व मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या मान्यतेने जनसुनावणी बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

मात्र त्यावेळी - **श्री नामदेव शेलार, शेतकरी** यांनी सूचना नोंदविण्याची मागणी केली.

अध्यक्ष व आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित मुद्यांव्यतिरिक्त सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याची सूचना केली.

१६) **श्री नामदेव शेलार, शेतकरी यांनी आक्षेप नोंदविला की -**

अ) माझी शेती डंपिंग ग्राऊंडच्या शेजारी आहे. मुळात मला नोटीस आलेली नाही, पण प्रकल्पाचे काम सुरु केलेले आहे. ही जागा अधिग्रहित करण्यात आली, तीच मुळी बेकायदेशीर आहे.

ब) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय हा डंपिंग प्रकल्प सुरु केलेला आहे, त्यासाठी गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया ही चालू करण्यात यावी,

क) आम्ही राहतो तेथे आम्हांला जायला - यायला रस्ता नाही,

ड) यावेळी आम्ही जमिनीत पीक लावणार नाही. डंपिंग ग्राऊडवर कचरा टाकता त्यादिवसापासून प्रकल्प उभारणीपर्यत आम्हांला महसूलच्या नियमानुसार नाही तर आमच्या उत्पन्नाच्या नियमानुसार आम्हांला भरपाई द्या. आमच्या शेतीची भरपाई द्या, कारण आम्ही आता शेती लागवड करुच शकत नाही. कचऱ्यामुळे पीकांवर किडे पडतील. शिवाय माणसे कामाला येत नाहीत. आमचा शेतीवरिल उदरनिर्वाह संपलेला आहे.

तरी आपण त्यांच्याविरुद्ध गुन्हे नोंद करण्याची व प्रकल्प रद्द करण्याची मागणी शासनास कळवावी.

मी महाराष्ट्र शासनाच्या १५ सचिवांना कोर्टातून नोटिस पाठविलेली आहे. हा प्रकल्प रद्द व्हावा हीच आमची मागणी असून आम्हांला नुकसानभरपाई देण्यात यावी.

आयोजिका, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, विचार, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल. त्यावेळी काही उपस्थितांनी बैठकीचे इतिवृत्त देण्याची माहिती दिली.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. ते इतिवृत, प्राप्त लेखी सूचना/आक्षेप, तसेच सुधारित पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण व वातावरणीय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती पुढील निर्णय घेईल. बैठकीचे इतिवृत्त हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सर्वांसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्राप्त झालेले १३२ सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत. मा. अध्यक्ष यांचे आभार मानून पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठक संस्थगित करण्यात आली.

| | |
|---|---|
| **(सौ. सौजन्या पाटील)** | **(किरण हसबनीस)** |
| आयोजक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, भिवंडी, | प्रादेशिक अधिकारी, |
| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, |
| कल्याण | कल्याण |

**(हरिश्चंद्र बा पाटील)**

अध्यक्ष,

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अपर जिल्हाधिकारी व अपर जिल्हादंडाधिकारी, ठाणे,

जिल्हा – ठाणे